**ठळक बातम्या**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या, राज्यातल्या नागरिकांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची विरोधी पक्षनेत्यांची मागणी
- इलेक्ट्रीक वाहन धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता, प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना मिळणार सवलत आणि टोलमुक्ती

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, श्रीलंकेत सुरु असलेल्या तिरंगी मालिकेत भारताचा दक्षिण आफ्रिकेवर १५ धावांनी विजय

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातल्या नागरिकांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली.

**होल्ड बाईट...फडनवीस**

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत पहलगाम हल्ल्यातल्या मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसंच त्यांच्या कुटुंबियांना शिक्षण आणि रोजगारासाठी मदत करणार असल्याचंही सरकारनं सांगितलं. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले संतोष जगदाळे यांची मुलगी आसावरी जगदाळे यांना सरकारी नोकरी देण्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

**<><><><><>**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या निवासस्थानी महत्त्वाची बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, राष्ट्रीय सुरक्षा

सल्लागार अजित दोवाल, सेनाप्रमुख सीडीएस अनिल चौहन तसंच तिन्ही सेनादलांचे प्रमुख बैठकीला उपस्थित होते.

<><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. तसं पत्र त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलं आहे. दहशतवादाविरुद्ध देशाची एकता दर्शवण्यासाठी आणि मृतांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी हे विशेष अधिवेशन बोलावावं, असं पत्रात म्हटलं आहे.

काँग्रेसच्या या मागणीवर भाजपानं टीका केली आहे. ही वेळ चर्चा करण्याची नसून पाकिस्तानला धडा शिकवण्याची असल्याचं ज्येष्ठ नेते अनुराग ठाकूर यांनी म्हटलं आहे. काँग्रेसनं या संदर्भात आधी आपली भूमिका स्पष्ट करावी असं आवाहन भाजपा प्रवक्ता शहजाद पूनावाला यांनी केलं आहे. काँग्रेसच्या काही नेत्यांनी या हल्ल्यासाठी भारतालाच जबाबदार धरलं आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२५ ला राज्यमंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत मान्यता दिली. त्यानुसार प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना सवलत, तसंच यापैकी काही प्रकारच्या वाहनांना विशिष्ट रस्त्यावर टोलमुक्ती दिली जाणार आहे.

हडपसर ते यवत राज्य मार्गाचं सहा पदरी बांधकाम आणि या रस्त्यावरच्या सहा पदरी उन्नत मार्गालाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. टेमघर प्रकल्पाच्या उर्वरित कामांसाठी आणि गळती प्रतिबंधक कामाच्या सुधारित खर्चालाही या मंत्रीमंडळबैठकीत मान्यता देण्यात आली.

PM-YASASVI या एकछत्री योजनेअंतर्गत ओबीसी, ईबीसी आणि डी.एन.टी. प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

योजनेंतर्गत केंद्र शासनानं सन २१२१-२२ ते २०२५-२६ या वर्षांसाठी जारी केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं यावेळी घेतला.

शेतीक्षेत्रातल्या गुंतवणुकीत वाढ करायला मंजुरी, पिक विमा योजनेत सुधारणा करणं, नौकाबांधणी, जहाज देखभाल यांना प्रोत्साहन आदी निर्णयही मंत्रिमंडळानं घेतले. तसंच साडे आठ मेगावॅट वीज निर्मितीसाठी ९ ठिकाणी पम्प स्टोरेज करारही यावेळी करण्यात आला.

<><><><><>

जलसंपदा विभागानं आज महाजेनको महाजनको रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड आणि अवादा अ‍ॅक्वा बॅटरीज प्रा. लि. या कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले. या करारांमुळे राज्य ऊर्जा निर्मितीत अधिक सक्षम होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला. यापुढच्या काळात ऊर्जा क्षेत्रातली कामं विहित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

उदंचन जलविद्युत प्रकल्प हे अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण आणि अद्ययावत तंत्रज्ञान आहे. या जलविद्युत प्रकल्पांद्वारे शेती, उद्योग आणि व्यावसायिक क्षेत्रासाठी विजेची वाढती मागणी पूर्ण करण्याबरोबरच शाश्वत आणि हरित उर्जा निर्मिती होणार आहे, त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्याच्या एकूण ऊर्जा निर्मितीच्या ५० टक्के अपारंपरिक ऊर्जा निर्मिती करण्याचा शासनाचा मानस असून त्यादृष्टीनं नियोजन सुरू असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे, श्रीलंकेत सुरु असलेल्या तिरंगी मालिकेत आज कोलंबो इथं झालेल्या सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेवर १५ धावांनी विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, आणि निर्धारित

२० षटकात ६ गडी गमावून २७६ धावा केल्या. प्रतिका रावळनं ७८, तर कर्णधार हरमनप्रित कौरनं नाबाद ४१ धावा केल्या. जेमिमा रॉड्रिग्जनं ४१ धावांचं योगदान दिलं.

दक्षिण आफ्रिकेला हे आव्हान पेलता आलं नाही. तजमिन ब्रिक्सनं १०९ धावांची दमदार खेळी केली. मात्र इतर फलदांजांना चांगली कामगिरी करता आली नाही, त्यामुळे सामन्यातले चार चेंडू बाकी असतानाच दक्षिण आफ्रिकेचा डाव २६१ धावांवर आटोपला. भारतातर्फे स्नेह राणानं ५ बळी घेतले. तीच या सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

<><><><><>

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना होत आहे. दिल्लीमधे, थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

<><><><><>

वेव्हज् २०२५ परिषद परवापासून मुंबईत सुरु होत आहे. या परिषदेमुळे देशातल्या तरुणांना खूप लाभ होईल, असं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी म्हटलं आहे. वेव्हजच्या केंद्रस्थानी आजची तरुणाईच असून कौशल्यविकास, स्वयंउद्योजकता आणि जागतिक सहकार्य क्षेत्रातल्या नव्या वाटा यामुळे खुल्या होतील, असा विश्वास त्यांनी यासंदर्भातल्या लेखात व्यक्त केला आहे.

<><><><><>

वेव्हज २०२५ या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणामुळे, रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारीत होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्रं उद्यापासून ४ मे पर्यंत रात्री साडेआठ वाजता प्रसारीत होईल. बातमीपत्राच्या वेळेतला हा बदल ३० एप्रिल ते ४ मे या कालावधीपुरताच आहे.

<><><><><>

राज्य वक्फ मंडळाशी संबंधित विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत वक्फ मंडळाचं संपत्ती व्यवस्थापन, निधी वितरण, शिक्षण, तसंच इमारत प्रकल्पांशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

राज्यातल्या मुस्लिम बांधवाना शिक्षणासह आरोग्यसेवा आणि आवश्यक सुविधा मिळाव्यात तसंच मुस्लिम तरुणांना रोजगाराभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षण मिळावे यासाठी सरकार कटीबद्ध असल्याचं पवार यावेळी म्हणाले.

<><><><>

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जनता वृत्तपत्राच्या तीन खंडाचं प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज मंत्रालयात झालं. यात खंड क्र. ७, ८ आणि ९ या तीन खंडासह, इंग्रजी खंड ४ चं मराठी भाषांतर, आणि इंग्रजी खंड २ च्या नव्या आवृत्तीचा समावेश आहे. प्रकाशन कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातले सदस्य उपस्थित होते.

<><><><>

शिक्षण आणि नवोन्मेष क्षेत्रात देशाचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि त्याला चालना देण्यासाठी, भारताची संशोधन परिसंस्था मजबूत करणं आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विकसित भारतासाठी शिक्षण, उद्योग आणि नवोन्मेष क्षेत्राला एकत्रित आणणाऱ्या युग्म संमेलनात ते बोलत होते.

<><><><>

शासकीय कर्मचाऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञानाचं प्रशिक्षण देण्यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागानं "TECH वारी - टेक लर्निंग वीक" हा उपक्रम हाती घेतला आहे. येत्या ५ ते ९ मे दरम्यान हे प्रशिक्षण वर्ग मुंबईत मंत्रालय इथं होणार आहेत.

<><><><>

गेल्या चोवीस तासात, विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकण, आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं ४४ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//